# उद्यान विद्या विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
# फळे व भाजीपाला प्रक्रिया पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम

जा.क्र./उविवि/फ.प्र.के./ /२०११ दि. १२/०५/२०११

भारत सरकार पुरस्कृत राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाअंतर्गत एक वर्ष कालावधीचा फळे व भाजीपाला प्रक्रिया पदविका अभ्यासक्रम उद्यान विद्या विभाग, डॉ.पंदेकृवि अकोला येथे सुरु करण्यात येणार आहे. त्याकरीता एकुण २५ प्रशिक्षणार्थीची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीना नियमानुसार रु.१५००/– (अक्षरी एक हजार पाचशे रू.) प्रति माह विद्यावेतन दिले जाईल. सदर अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी प्रशिक्षणार्थीनी खालीलप्रमाणे पात्रता पुर्ण करणे आवश्यक आहे.

१. प्रशिक्षणार्थी अभ्यासक्रमाला अर्ज करतांना कोणत्याही शाखेचा १२ वी उत्तीर्ण असावा व त्यासाठी कमीत कमी ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे.
२. प्रशिक्षणार्थीला प्रक्रिया व फलोत्पादन क्षेत्रात अभिरुची असावी.
३. प्रशिक्षणार्थीचे वय – १८ ते ३५ वर्ष असावे.
४. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीसाठी वसतीगृहाची व्यवस्था नाही, त्यांनी स्वत व्यवस्था करावयाची आहे.
५. प्रवेश अर्जासोबत प्रशिक्षणार्थीनी खालील नमुद केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती प्रमाणित करुन जोडाव्या.

अ) १२ वी पास बाबतचे गुणपत्रक, प्रमाणपत्र (कमीत कमी ४० टक्के गुण)
ब) शाळा सोडल्याचा दाखला (जन्मतारखेची नोंद असणे आवश्यक)
क) उमेदवार मागासवर्गीय असल्यास तसा विहीत नमुन्यातील सक्षम अधिका–याचा दाखला
ड) प्रवेश घेतांना मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मुळ प्रमाणपत्रे अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतरच परत करण्यात येईल व मध्येच झेरॉक्स व इतर कुठल्याही कामासाठी मुळ प्रमाणपत्रे देण्यात येणार नाहीत.
इ) प्रशिक्षणार्थीनी प्रवेश घेताना इतरत्र कोणत्याही संस्थेत वा तत्सम प्रशिक्षणाकरिता प्रवेश घेतलेला नसावा. त्याबाबतचे हमीपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
ई) अर्ज पोस्टाने पाठविले जाणार नाही तसेच दिलेल्या तारखेनंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाही.

प्रवेश अर्ज उद्यान विद्या, डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला येथे रु ५०/– (रु पन्नास फक्त) रोखीने भरुन दि. १५/०५/२०११ ते २६/०५/२०११ या कालावधीत फक्त कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. विहित नमुन्यात अर्ज भरुन वर नमुद केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रमाणित

सत्यप्रतीसह विभाग प्रमुख, उद्यान विद्या विभाग, डॉ.पंदेकृवि., अकोला या पत्यावर स्वत: या कार्यालयास सादर करावा किंवा पोस्टाने पाठवावा. पोस्टाने पाठविल्यास त्याची पोच दिली जाणार नाही. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २६/०५/२०११ दुपारी ५.०० वाजेपर्यत राहील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कुठल्याही स्तरावर विचार केला जाणार नाही.

प्रशिक्षणार्थीच्या निवडीसाठी १०० गुणांची वस्तुनिष्ठ **(Objective)** मराठीतून सामान्यज्ञान व कृषी विषयावर आधारीत लेखी परीक्षा दि. ११/०६/२०११ (शनिवार) वेळ सकाळी १० ते १२ या वेळेत घेण्यात येईल. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थीची गुणवत्तेनुसार निवड केली जाईल व त्याची यादी उद्यान विद्या विभाग यांच्या कार्यालयात दि. १५/०६/२०११ रोजी लावण्यात येईल.

प्रशिक्षणार्थीची निवड करतांना नियमानुसार आरक्षण देण्यात येईल. प्रवेश देण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधी संपल्याशिवाय मध्येच सोडून जाणार नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र ५० रु च्या स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारासह सादर करणे प्रशिक्षनार्थीना बंधनकारक राहील. प्रवेश घेतांना आवश्यक प्रमाणपत्राच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्रे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानतरच परत करण्यात येईल. वरील कार्यक्रमात काही बदल झाल्यास प्रवेश प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार निवड समितीस राहतील.

विभाग प्रमुख
उद्यान विद्या विभाग
डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला.